**– सत्र खटला क्र.१३/२०२१ मधील नि.क्र.१३८ वरील आदेश –**

(घोषित दि. १७/०१/२०२३)

१. प्रस्तुतचा अर्ज आरोपी क्र.२१ यांनी त्यांना परदेशात जाण्यासाठी पासपोर्ट काढणेस ना–हरकत परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. आरोपी यांचे असे म्हणणे आहे की , त्यांचेविरुध्द भा.द.वि.कलम ३५३,३३२, ३४२,३२४,१४७,१४३,१४८,१४९,३२३,५०४,५०६,१०९,१२०–बी, तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३ अन्वये गुन्हा दाखल असून त्याबाबतचा खटला या न्यायालयात प्रलंबित आहे . सदर खटला राजकीय वैमनस्यातून दाखल झालेला असून या घटनेशी आरोपी क्र.२१ चा वैयक्तिकरित्या कोणताही संबंध नाही, केवळ राजकीय पक्षाचे कार्यकर्ते म्हणून त्यांना यामध्ये गोवण्यात आलेले आहे. आरोपी हे बाजारपेठ, कणकवली येथील कायमचे रहिवाशी असून गेली बरीच वर्षे ते सदर ठिकाणी व्यवसायानिमित्त स्थायिक झालेले आहेत. आरोपी क्र.२१ यांना त्यांच्या कुटुंबासोबत खाजगी कामानिमित्त परदेशी जाण्याचे असल्याने त्यांना पासपोर्टची आवश्यकता आहे . सदर पासपोर्ट मिळणेकरिता शासकीय कार्यालयातून विहीत नमुन्यात अर्ज करावयाचा असल्याने आरोपीविरुध्द न्यायालयात कोणताही फौजदारी खटला प्रलंबित आहे किंवा कसे याबाबत माहिती विहीत अर्जामध्ये नमूद करावाची असते. त्यामुळे मे. न्यायालयात सदरचा खटला प्रलंबित असल्याने मे . न्यायालयाकडून पासपोर्ट काढणेस ना–हरकत परवानगी मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे . आरोपी यांचे पुढे असेही कथन आहे की, आरोपी यांचेवर दाखल असलेला खटला हा कोणत्याही वैयक्तिक स्वरुपाचा खटला नसून सदर खटला केवळ राजकीय वैमनस्यातून दाखल झालेला आहे. आरोपी यास केवळ कामानिमित्त परदेशात जायचे असून सदर कालावधीनंतर आरोपी या मे . न्यायालयात नेमलेल्या तारखांना नियमित हजर राहणार आहे . त्यामुळे आरोपी यास पासपोर्ट काढणेस ना –हरकत परवानगी न मिळाल्यास

आरोपीच्या कुटुंबाचे मोठे नुकसान होणार आहे , तरी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येवून आरोपींना पासपोर्ट काढणेस ना–हरकत परवानगी देणेत यावी, अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर विशेष सरकारी अभियोक्ता यांनी अर्जावरच म्हणणे दाखल करुन आरोपीने सदर अर्ज कोणत्या कायदेशीर तरतुदीखाली दाखल करणेत येतो याबाबत तरतुद नमूद करणेत यावी असे म्हटले आहे. तसेच तपासी अंमलदार यांनी म्हणणे दाखल केलेले नाही.

४. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. सरकारपक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता श्री .गव्हाणकर यांनी असा युक्तिवाद केला की , आरोपीने या अर्जामध्ये कोणती कायदेशीर तरतूद लागू आहे यासाठी उल्लेख केलेला नाही . त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा . तसेच आरोपीच्या विद्वान विधिज्ञांतर्फे असा युक्तिवाद करणेत आला की, प्रस्तुतचा अर्ज हा आरोपी याने पासपोर्ट काढणेस ना–हरकत प्रमाणपत्र/परवागनी मिळणेबाबत दाखल करणेत आला आहे . पासपोर्ट ॲथोरिटीकडून पासपोर्ट मिळणेसाठी अर्ज केल्यावर न्यायालयात केस प्रलंबित असल्यास त्याबाबतची परवानगी न्यायालयामार्फत घेणे क्रमप्राप्त आहे . यासाठी कायदेशीर तरतुदीची आवश्यकता नाही. सबब, अर्ज मंजूर करणेत यावा.

५. युक्तिवादाच्या अनुषंगाने कागदपत्रांचे अवलोकन करता असे स्पष्ट होते की, प्रस्तुतचा खटला हा सन २०२१ या वर्षातील असून सध्या खटला औपचारिक चौकशीच्या टप्प्यावर नेमणेत आला आहे. आरोपीने प्रस्तुत अर्जान्वये पासपोर्ट काढणेसाठी परवानगी न्यायालयाकडून मागितलेली आहे . कोणत्याही न्यायालयात फौजदारी खटला प्रलंबित असल्यास संबंधित न्यायालयाच्या परवानगीशिवाय पासपोर्ट काढता येत नाही अशी त्रुटी काढली जावू शकते . सबब, अर्ज हा केवळ पासपोर्ट काढणेस परवानगी मिळणेबाबत असल्यामुळे तो मंजूर करणेस कोणतीही कायदेशीर अडचण नाही. करिता खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## **– आदेश –**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. आरोपी क्र.२१ श्री.जावेद रशिद शेख यांना पासपोर्ट काढणेस परवानगी देण्यात येते आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SANIKA SATISH JOSHI
Date: 2023.01.19 16:10:25 +0530

दिनांक –१७/०१/२०२२ (श्रीमती सानिका एस.जोशी)
सिंधुदुर्ग – ओरोस. सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग ओरोस.